नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०९/०९/२०२५ ( मंगळवार )**

---

## मा. पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांची उमरेड येथे गणेश विसर्जन मिरवणुकींना भेट

दिनांक ०८/०९/२०२५ रोजी मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी पोलीस स्टेशन उमरेड येथे गणेश विसर्जन बंदोबस्ताला भेट देवुन बंदोबस्ताची पाहणी केली आणि गणेश विसर्जन मिरवणुकीचे वैयक्तिक निरीक्षण केले. मा पोलीस अधिक्षकांनी मिरवणुकी दरम्यान आयोजक, पोलिस कर्मचारी आणि जनतेशी संवाद साधला. मा पोलीस अधिक्षकांनी संपूर्ण गणेशोत्सवात कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राखण्यात नागरिक आणि गणेश मंडळांनी दिलेल्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. सदर वेळी उमरेड राजा या गणेश मंडळाचे सुव्यवस्थित आणि शिस्तबद्ध मिरवणुकीचे विशेषत: कौतुक केले. बंदोबस्तात तैनात केलेल्या पोलीस अधिकारी आणि अंमलदारा यांच्या काटेकोर नियोजन वाहतूक व्यवस्थापन, गर्दी नियंत्रण या मुळे गणेश विसर्जन बंदोबस्त सुरळीत पार पडल्याबाबत मा. पोलीस अधिक्षकांनी सर्व अधिकारी आणि अंमलदारांचे अभिनंदन केले.


उमरेड
चा
राजा



## अवैधरित्या मोहाफुल दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन कुही** :— दिनांक ०८/०९/२०२५ रोजी कुही पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, ऑटोमध्ये मोहाफुल दारूची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मौजा कुही फाटा येथे नाकाबंदी केली असता ऑटो क्र.एमएच ४९ ए आर ५९५१ मिळुन आला. वाहन थांबवुन वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता त्यात मोहाफुल दारू मिळुन आली. आरोपी नामे शेख अफजल शेख ईब्रहीम ,वय २९ वर्ष रा.अयोध्या नगर नागपुर हा अवैधरीत्या मोहाफुल दारूची वाहतुक करतांना मिळुन आला. पोलीसांनी पंचासमक्ष १) १६० लिटर मोहाफुल दारू किंमती ८०००/— रूपये आणि ऑटो क्र.एमएच ४९ ए आर ५९५१ किंमती ७०,००० /— रूपये असा एकुण किंमती ७८,०००/— रुपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.

नमुद आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन कुही येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## पोलीस स्टेशन जलालखेडा अंतर्गत भारसिंगीतील पथदीवे बंद या बातमीबाबत

दिनांक ०५/०९/२०२५ रोजी  एका वृत्तपत्रात अंधारात महामार्ग, भारसिंगीतील पथदिवे बंद अशा मथळयाखाली बातमी प्रसीध्दी झाली आहे. सदर पथदिवे सुरू करण्याबाबत जलालखेडा पोलीसांनी भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (National Highways Authority of India) चे अधिकारी यांना पत्रव्यवहार करून बोलणे केले असुन भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण तर्फे सदर पथदिवे बसविण्याबाबत कारवाई करण्यात येत असल्याचे NHAI चे अधिकारी यांनी सांगितले आहे.

## नागपुर ग्रामीण जिल्हयातील ६३१ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक ०९/०९/२०२५ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २१ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण  ६३१ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बोरी येथे ३१ आरोपी , ,पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३३ आरोपी अशा एकुण ९४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे २७ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे २८ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २८ आणि पोलीस स्टेशन वेलतुर २७ आरोपी अशा एकुण ११० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ३१ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे २१ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २८ आरोपी आणि

पोलीस स्टेशन केळवद येथे ३४ आरोपी अशा एकुण ११४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे २८ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे ३४ आरोपी अशा एकुण ६२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे २५ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३३ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २६ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे येथे २५ आरोपी अशा एकुण १०९ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ४५ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ३८ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे २८ आरोपी अशा एकुण १४२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सर्व ६ उपविभागातील सर्व २१ पोलीस स्टेशन येथे एकुण ६३१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**






मा. पोलीस अधिक्षक

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर

यांच्या मान्यतेने